# विद्यापीठ अधिनियम समिती अध्यक्षपदी डॉ. सुखदेव थोरात

■ लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांना अनुसरून उच्च शिक्षणातील नवे प्रवाह सामावून घेण्यासाठी तसेच राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा केली जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

सूचना www.unipune.ac.in या संकेतस्थळावर १३ डिसेंबर पर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिव्यांगांना सहानुभूती नको, सहकार्य हवे : महाजन

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : दिव्यांगांना समाजाची सहानुभूती नको तर आत्मविश्वास वाढविण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य हवे, असे प्रतिपादन जळगाव येथील यजुर्वेंद्र महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठ समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिन ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखा विद्या शाखेच्या अधिष्ठाता प्राचार्या डॉ. मेघा गुळवणी होत्या. महाजन म्हणाले, दिव्यांगांना त्यांच्या अपंगत्वावर कशी मात करता येईल, याचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. कल्याणी साठे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

# विद्यापीठात दिव्यांग दिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्किम फॉर पर्सन्स वुईथ डिसॅबिलिटीज, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी जागतिक दिव्यांग दिन ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. जळगाव येथील दीपस्तंभ फाऊंडेशनचे संस्थापक व कार्यकारी संचालक यजुवेंद्र महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मेघा गुळवणी होत्या. समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. कल्याणी साठे यांनी सूत्रसंचालन केले.

# पदव्युत्तर प्रथम वर्षाची सोमवारपासून प्रवेश प्रक्रिया

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या वतीने प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या असून, त्यांचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. विद्यापीठाने गुरुवारी अधिविभागांना परिपत्रक काढले आहे. त्यानुसार ७ ते १४ डिसेंबर याकालावधीत पदव्युतर प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. विद्यार्थ्यांना अधिविभागस्तरावर मेरिटनुसार प्रवेश निश्‍चित करता येणार आहेत. अधिक माहितीसाठी विभागासाठी संपर्क साधण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

व्याख्यानमाला : शिवाजी विद्यापीठ व केआयटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय संयुक्त विद्यमाने उद्योगभूषण शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमाला, विषय : तंत्रज्ञान युगातील सामाजिक भान , वक्ते : काडसिद्धेश्वर महास्वामी, स्थळ : के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ शिरगाव, वेळ दुपारी ३.३० वाजता.